UGC Care Listed Journal, ISSN 2231 - 573X
साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक

# तिफण

MAH MAR 34737/13/1/2009-TC

वर्ष १३ वे, अंक - दुसरा    जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर २०२२

## मराठी बोलीभाषा विशेषांक

● संपादक ●

डॉ. शिवाजी हुसे

● अतिथी संपादक ●

डॉ. मारोती घुगे

● संपादक मंडळ ●

डॉ. सुभाष बागल
डॉ. सुभाष शेकडे
डॉ. राजकुमार मुसणे
डॉ. ताहेर पठाण
डॉ. रामचंद्र झाडे
डॉ. दत्तात्रय डुंबरे
डॉ. दिलीप बिरुटे
डॉ. प्रेमला मुखेडकर
डॉ. रंजना कदम
डॉ. सुखदेव इघारे

मूल्य : २५० रुपये

या अंकातील लेखकांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. या नियतकालिकास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदान प्राप्त झाले आहे; परंतु या नियतकालिकात प्रसिद्ध झालेली मते मंडळास मान्य असतीलच असे नाही.

पत्ता : संपादक, तिफण, 'शिवार', श्रीराम कॉलनी, हिवरखेडा रोड,
कन्नड, जि. औरंगाबाद – ४३११०३, मो. ९९०४००३९९८

साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक

# तिफण

वर्ष १३ वे, अंक - दुसरा     जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर २०२२

UGC Care Listed Journal
ISSN 2231 - 573X

● संपादक ●
डॉ. शिवाजी हुसे

पत्ता : संपादक, तिफण, 'शिवार', श्रीराम कॉलनी, हिवरखेडा रोड,
कन्नड, जि. औरंगाबाद – ४३११०३, मो. ९९०४००३९९८

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | लेखाचे शीर्षक / लेखकाचे नाव | पृ. क्र. |
|---|---|---|
| १. | **मराठी बोलींच्या अभ्यासाचे महत्त्व**<br>- डॉ. गणपत ढेंबरे | १ - ७ |
| २. | **बृहन्महाराष्ट्र : मराठी भाषा आणि अध्ययन, अध्यापनाचे स्वरूप**<br>- डॉ. संजयकुमार करंदीकर | ८ - १३ |
| ३. | **मराठी लिपी सुधारणा : काही उपाय**<br>- डॉ. सुधाकर शेलार | १४ - २० |
| ४. | **आगरी बोली उद्‌गम व विकास**<br>- डॉ. अनिल बळीराम बांगर | २१ - २७ |
| ५. | **मॉरिशसमध्ये मराठी भाषेचे एक ओझरते दृष्टिक्षेप**<br>- डॉ. बीदन आबा | २८ - ३० |
| ६. | **कृषिसंस्कृती, बोलीभाषांचे जतन व व्यवस्थापनाचे आवाहन**<br>- डॉ. दत्तात्रय प्रभाकर डुंबरे | ३१ - ३४ |
| ७. | **आदिवासी बोलींचे ऐतिहासिक, भाषिक व वाङ्‌मयीन महत्त्व**<br>- डॉ. कैलास सोनू महाले | ३५ - ३७ |
| ८. | **सातारी बोलीतील लोकधन - हुमणे (कोडी)**<br>- डॉ. जया कदम | ३८ - ४२ |
| ९. | **वारकरी संतविषयक कादंबरीची भाषाशैली**<br>- राजेंद्र थोरात | ४३ - ४६ |
| १०. | **यशवंतराव चव्हाण यांचे साहित्य आणि मराठी भाषा व संस्कृतीविषयक धोरणे** - डॉ. नानासाहेब धों. पवार | ४७ - ५३ |
| ११. | **अहिराणी बोली स्वरूप व वैशिष्ट्ये**<br>- डॉ. प्रकाश शेवाळे | ५४ - ५७ |
| १२. | **मराठवाड्यातील गोदाकाठच्या परिसरातील बोलीभाषा**<br>- डॉ. शंकर मुंडे | ५८ - ६१ |
| १३. | **बोलीभाषा अभ्यासाचे महत्त्व**<br>- डॉ. मंजुषा दिगंबर समर्थ | ६२ - ६४ |
| १४. | **संत तुकारामांच्या कवितेतून येणारी बोलीभाषा**<br>- बालासाहेब विष्णु कटारे | ६५ - ६८ |




# यशवंतराव चव्हाण यांचे साहित्य आणि मराठी भाषा व संस्कृतीविषयक धोरणे

- **डॉ. नानासाहेब धों. पवार**
(मराठी विभाग)
अण्णासाहेब मगर महाविद्यालय, हडपसर, पुणे - २८.
ई-मेल : npnanapawar506@gmail.com, मो. ७८७५०६९८७७

यशवंतराव चव्हाण यांनी जे विविध वाङ्मय प्रकारांमध्ये लेखन केले आहे, त्या प्रत्येक वाङ्मय प्रकाराची स्वत:ची अशी काही अंगभूत वैशिष्ट्ये आहेत. त्या त्या वाङ्मयप्रकारातील आदर्श व श्रेष्ठ लेखन कोणते असते, त्याचा सविस्तर आढावा घेतला तर यशवंतराव चव्हाण यांच्या एकूणच लेखनाच्या आधारे लेखनमीमांसेची निकषव्यवस्था तयार करणे अपरिहार्य ठरते. त्यामुळेच काही निश्चित निकषव्यवस्थेच्या आधारे त्यांच्या संपूर्ण लेखनाचे मूल्यमापन करणे शक्य होते. त्याचप्रमाणे त्यांनी मराठी भाषा व संस्कृती विषयक कोणकोणती धोरणे आपल्या राजकीय व सार्वजनिक जीवनात आखली आणि पूर्णत्वास नेली. याचा या शोधनिबंधात अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे.

## १. यशवंतरावांच्या लेखनातून व्यक्त होणारा विचार :

यशवंतराव चव्हाण यांचा महाराष्ट्राच्या आणि भारताच्या राजकीय, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक क्षेत्रांशी अत्यंत घनिष्ठ संबंध होता. राजकारणामध्ये त्यांनी विविध पदे भूषवली. मुख्यमंत्रीपदापासून ते उपपंतप्रधानपदापर्यंत त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा आलेख चढता आहे. त्यांचे कार्यकर्तृत्व बहरत असताना त्यांनी वेगवेगळ्या विषयांवर आपले विचार व्यक्त केलेले आहेत. तसेच त्यांच्या लेखनामधूनही त्यांच्या विचारांची काही वैशिष्ट्ये सहजपणे दिसून येतात. यशवंतराव चव्हाण यांचे नेतृत्व सर्वसामान्य बहुजन समाजाचा विचार करणारे होते. त्यामुळे शेतकरी, स्त्रिया, कामगार त्याचबरोबर सहकार, शिक्षण इ. सर्वसामान्यांच्या जीवनाशी संबंधित विषयांवर त्यांनी जिव्हाळ्याने व आत्मीयतेने विचार मांडले आहेत. ग्रामीण महाराष्ट्राच्या मातीशी त्यांची नाळ जोडलेली होती. त्यामुळे त्या अनुषंगानेही त्यांचे विचार व्यक्त झाले आहेत. साहित्यिक, कलावंत, लेखक यांच्याशीही त्यांचे निकटचे संबंध होते वाचनाच्या आवडीमुळे साहित्य, भाषा, साहित्यिक, लेखकाचे - कलावंताचे समाजातील स्थान यासंबंधीचे विचार त्यांच्या एकूण सर्वच लेखनामधून आले आहेत. आत्मचरित्रलेखनामध्ये सत्यता, वस्तुनिष्ठता, प्रांजळपणा, विनम्रता, तटस्थता, अंतर्मुखता, कलात्मकता याचे भान आत्मचरित्रकाराने राखणे आवश्यक असते. यशवंतराव चव्हाण यांच्या कृष्णाकाठ या आत्मचरित्रामध्ये त्यांनी मांडलेल्या सर्वच आठवणींमधून या गुणांचा प्रत्यय येतो. त्यांच्या बालपणीच्या आठवणी, गावाविषयीची आस्था, कुटुंबाचे कष्टप्रद जीवन, आई विठाई व वडीलबंधू गणपतरावांकडून मिळालेली शिकवण, त्यांच्यावरील संस्कार, विविध चळवळींमधील सक्रिय सहभाग, एक कार्यकर्ता म्हणून जडणघडण, राजकारणातील दूरदृष्टी यांविषयी त्यांनी जे लेखन केले आहे ते आदर्श आत्मचरित्राच्या कसोटीवर उतरणारे आहे. त्यातून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची सर्व वैशिष्ट्ये आणि त्यांचा जीवनविषयक व कलाविषयक दृष्टिकोनही प्रकट होतो. महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासामध्ये यशवंतरावांचे